साप्ताहिक

पत्रकारितेचे मुल्य जतन करणारे वृत्तपत्र

# न्यायस्वातंत्र्य समता

■ RNI. No- MAHMAR/2010/36016 संपादक :- रमेश शेळके कार्यकारी संपादक :- ॲड. चंद्रकांत गायकवाड

■ वर्ष ६ वे ■ अंक १८ वा ■ सोमवार, दि. ३० मे ते ५ जून २०१६ ■ पुणे web : nyayaswatantryasamta.weebly.com ■ किंमत २ रुपये ■ पाने ४


सुवर्ण संधी

वृत्तपत्रामध्ये काम करण्याची सुवर्ण संधी, वयाची अट नाही. पत्रकारितेचे प्रशिक्षण दिले जाईल.

संपर्क : ९८२२५३८५८५

# राज्य शिकाऊ परिषद स्थापन्याची परवानगी मिळावी : मुख्यमंत्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राज्य शिकाऊ (अप्रेन्टीसशीप) परिषद स्थापण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पंतप्रधान कार्यालयात झालेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास आढावा बैठकीत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी रात्री येथे यासंदर्भातील बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. माहिती व तंत्रज्ञान मंत्री रवी शंकर प्रसाद, मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री कलराज मिश्र, केंद्रीय कौशल्य विकास राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) राजीव प्रताप रुडी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जम्मू काश्मिरच्या मुख्यमंत्री महेबुबा मुफ्ती, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री कलिखो पुल आणि केंद्राचे व विविध राज्यांचे वरिष्ठ अधिकारी यासह विविध क्षेत्रातील तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते.

प्रशिक्षणार्थी कायद्यात बदल केल्याने राज्याला सर्वाधिक फायदा झाल्याचे सांगुन मुख्यमंत्री पुढे म्हणाले, यामुळे राज्यात यावर्षी जवळपास ६० हजार प्रशिक्षणार्थी उमेदवार तयार करू शकते. जे इतर राज्याच्या तुलनेत सर्वाधिक आहेत. परिषद स्थापन केल्याने याअंतर्गत छोटे-छोटे अभ्यासक्रम तयार करून यांना प्रमाणित करण्यात येईल. यामुळे अधिक रोजगार उपलब्ध होऊ शकतो. याशिवाय प्रक्षिणार्थींना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण अभियानाला केंद्र शासनाच्या मुद्रा अथवा इतर योजनांना जोडण्यात यावे. जे उमेदवार आठवी पास झाल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण घेतात त्यांना दहावी उत्तीर्णाचा दर्जा प्राप्त व्हावा तसेच जे दहावीनंतर प्रशिक्षण घेतात त्यांना पदवी अभ्यासक्रमाला सरळ प्रवेश मिळावा अशी मागणीही राज्यातर्फे करण्यात आली.

राष्ट्रीय कौशल्य विद्यापीठ तयार करावे त्यासाठी कृती आराखडा तयार करावा. राज्यांनाही अशी विद्यापीठ तयार करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणीही मुख्यमंत्री यांनी बैठकीत केली. याबाबत केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी बैठकीत सकारात्मकता दर्शविल्याचे मुख्यमंत्री यांनी बैठकीनंतर बोलताना सांगितले. विद्यापीठ बनविताना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाप्रमाणे प्रशिक्षकांची नियुक्ती केली जाते. मात्र कौशल्य विद्यापीठ बनवितांना उद्योग क्षेत्रातील तसेच तत्सम तज्ज्ञ प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, असे मुख्यमंत्री यांनी बैठकीत सूचविले.

कौशल्य प्रशिक्षणाबाबत आंतरराष्ट्रीय मानक तयार करण्यावर या बैठकीत चर्चा झाली. ऑस्ट्रेलिया व इंग्लड मानकांवर सर्वोत्तम असून या आधारावर हे मानक तयार करण्यात यावे यावर सर्वांनी सहमती दर्शविली. असे मानक तयार झाल्यास भारतीयांना जगाच्या पाठीवर रोजगार उपलब्ध होऊ शकेल. यासह बैठकीत कौशल्य विकास अभियानात राज्यांची सद्यस्थिती, येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



## मोदींना पाठींबा दिल्याने माफी मागतो : जेठमलानी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ज्येष्ठ विधिज्ञ व माजी केंद्रीय मंत्री राम जेठमलानी यांनी २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठींबा देऊन चूक झाल्याचे सांगत, त्याबद्दल मी देशातील नागरिकांची माफी मागतो, असे म्हटले आहे.

जेठमलानी यांनी मोदींना लक्ष्य करताना म्हटले आहे की, मोदींनी निवडणुकीपूर्वी परदेशातील काळा पैसा भारतात परत आणण्याचे आश्वासन दिले होते. ते त्यांनी पूर्ण केलेले नाही. मोदी सरकारने लोकांना फसवले आहे आणि मी त्यांना पाठींबा दिला होता. ती एक चूक होती आणि त्याबद्दल मी सर्व जनतेची माफी मागतो.

काळा पैसा देशात परत आणावा हीच मोदी सरकारकडून अपेक्षा असल्याचे सांगत जेठमलानी म्हणाले, परदेशातील ९० लाख कोटी रुपये देशात परत आणून प्रत्येक गरीब व्यक्तीला १५ लाख रुपये देण्याचे आश्वासन मोदींनी दिले होते. मात्र त्यांचेच पक्षाध्यक्ष अमित शहा यांनी ते आश्वासन एक निवडणूक जिंकण्यासाठी केलेली एक युक्ती असल्याचे वक्तव्य केले आहे.

राज्यसभा निवडणुकीसाठी राम जेठमलानी यांना बिहारच्या महायुतीतील राष्ट्रीय जनता दल युनायटेडकडून उमेदवारी देण्यात आली आहे. पक्ष विरोधी कारवाया केल्याबद्दल राम जेठमलानी यांची भारतीय जनता पक्षाने मे २०१३ मध्ये पक्षातून हकालपट्टी केली होती.

# ग्राहकांवर १५ टक्के सेवाकराचा भुर्दंड

## अर्धा टक्का कृषी कल्याण अधिभार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सेवाकरात कृषी कल्याण अधिभाराचा अंतर्भाव केल्याने आजपासून ग्राहकांना १५ टक्के सेवाकर द्यावा लागणार आहे. यामुळे हॉटेलिंग, मोबाईल बिल, प्रवास, विमा तसेच इतर गुंतवणूक सेवांसाठी ग्राहकांना सेवाकराच्या रूपाने जादा पैसे मोजावे लागतील. त्याशिवाय १० लाखांवरील कार खरेदीवर एक टक्का कर आकारला जाणार आहे.

अर्थसंकल्पात अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अर्धा टक्का कृषी कल्याण अधिभार प्रस्तावित केला होता. शेतकऱ्यांच्या हितासाठी राबवल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांसाठी कृषी कल्याण अधिभारातील निधी वापरला जाणार आहे. गेल्या वर्षी सरकारने सेवाकर १२.३६ टक्क्यांवरून १४ टक्क्यांपर्यंत वाढविला. त्यात अर्धा टक्का स्वच्छ भारत अधिभार लागू करण्यात आला. आता कृषी कल्याण अधिभाराने सेवाकर थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. त्याचबरोबर १० लाखांवरील मोटार कार खरेदीवर एक टक्का जादा कर आकारला जाणार आहे. मोटारीच्या एक्स शोरूम किमतींवर वितरकाकडून एक टक्का कर आकारला जाईल. यामुळे नव्याने कार खरेदी करणाऱ्या ग्राहकांना १० लाखांवरील कारसाठी किमान १० हजारांची जादा तरतूद करावी लागेल.

(पान २ वर)

## राजधानीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त अभिवादन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९१ वी जयंती महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्रात साजरी करण्यात आली. कोपरनिकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात राजशिष्टाचार तथा गुंतवणूक आयुक्त लोकेश चंद्र यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर निवासी आयुक्त समीर सहाय, सहायक निवासी आयुक्त भारती झाडे, डॉ. किरण कुलकर्णी, अजितसिंग नेगी, संजय आघाव यांच्यासह महाराष्ट्र सदन तसेच महाराष्ट्र परिचय केंद्राचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही

(पान २ वर)

# करवाढीतून डिझेल वगळल्याने राज्यातील सर्वसामान्यांना दिलासा

**मुंबई :** राज्यात विक्री होणाऱ्या पेट्रोलियम पदार्थावर करण्यात आलेल्या करवाढीतून सार्वजनिक वाहतूक आणि मालवाहतुकीला फटका बसू नये, यासाठी डिझेल वगळण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तसेच पेट्रोलच्या विक्रीवर करवाढ करण्यात आली असली तरी शासनाच्या पाठपुराव्यानंतर मुंबईत स्थित तेल कंपन्यांनी राज्य विशेष अधिभार कमी केल्याने पेट्रोलचे नवीन दर १ एप्रिल २०१६ रोजी असणाऱ्या दराच्या तुलनेत ३० पैशांनी कमीच असणार आहेत, तर डिझेलचे दर यापूर्वीच २.२० रुपयांनी स्वस्त झाले आहेत.

मुंबईत स्थित असलेल्या ऑईल कंपन्या प्रक्रियेसाठी कच्चे तेल (क्रुड ऑईल) मागवितात. या तेलावर त्यांना महापालिकेची जकात भरावी लागते. त्यामुळे या कंपन्यांकडून राज्यात विक्री होणाऱ्या पेट्रोलियम पदार्थांवर राज्य विशेष अधिभाराची आकारणी केली जाते. मे २०१२ पासून मुंबईमध्ये पेट्रोलवर ३.३० रुपये प्रति लिटर तर डिझेलवर २.४४ रुपये प्रति लिटर तसेच उर्वरित महाराष्ट्रात पेट्रोलवर २.४४ रुपये प्रति लिटर तर डिझेलवर २.१३ रुपये प्रति लिटर एवढ्या अधिभाराची आकारणी करण्यात येत होती. मात्र, कच्च्या तेलाच्या किंमतीत गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने या कंपन्यांना तुलनेने कमी जकात भरावी लागली. तरीही राज्य विशेष अधिभारात मात्र त्यांच्याकडून कोणतीही घट करण्यात आली नव्हती. ही बाब लक्षात आल्यानंतर राज्य शासनाने पाठपुरावा करून हा अधिभार कमी करण्यास या कंपन्यांना भाग पाडले.

या कमी करण्यात आलेल्या अधिभारामुळे पेट्रोलच्या किरकोळ विक्री किंमतीत ८ एप्रिल २०१६ ला १.२१ रुपये प्रति लिटर तर १७ मे २०१६ ला १.४२ रुपये प्रति लिटर अशी २.६३ रुपये एवढी एकत्रित घट झाली आहे. त्याचप्रमाणे डिझेलच्या किरकोळ विक्री किंमतीतही २.२० रुपये प्रति लिटर एवढी घट झाली आहे. गतवर्षी कच्च्या तेलाच्या किंमतीत घसरण झाल्यामुळे पेट्रोलियम वस्तूंच्या विक्रीतून राज्याला मिळणाऱ्या करात १८०० कोटींची घट झाली असून चालू वर्षामध्येही २७० कोटींची घट अपेक्षित आहे. त्यामुळे राज्याच्या विकासासाठी महसुलात वाढ होणे गरजेचे होते. त्यादृष्टीने आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजना शासनाकडून करण्यात येत आहेत.

कमी झालेल्या अधिभारामुळे राज्यात पेट्रोलचे दर १ एप्रिल २०१६ रोजी असणाऱ्या दरापेक्षा २.६३ रुपये प्रति लिटर कमी झाले आहेत. त्यानंतर केंद्र शासनाने पेट्रोलच्या किंमतीत ०.८३ रुपये प्रति लिटर वाढ केल्याने पेट्रोलची प्रत्यक्षातील किंमत १.८० रुपयाने कमी झाली आहे.

# गायींची बेकायदा वाहतूक : तिघांना जमावाने झोडपले

**प्रतापगढ (राजस्थान) :** गो-मांसाचा मुद्दा आणि त्यासंबंधित हिंसाचार अजूनही चर्चेत असतानाच राजास्थानातील प्रतापगढ जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर राजस्थान पोलिसांसह सुमारे १५० जणांच्या जमावाने ९६ गुरांची वाहतूक करणारे दोन ट्रक अडवून गो वाहतूकदारांना जबर मारहाण केली.

या जमावात बजरंग दल आणि गो रक्षा समितीचे समर्थक सामील होते. सदर ट्रक राजस्थानातील जयपूर आणि अजमेर येथून खरेदी केलेली गुरे घेऊन गुजरात आणि महाराष्ट्रातील कत्तलखान्यांकडे चालले होते. पोलिसांनी एक ट्रक जप्त केला परंतु दुसरा ट्रक जमावाने ताब्यात घेत त्यातील एका वाहतूकदाराला खाली खेचून झोडपून काढले.



एकूण सात वाहतूकदारांना आणि एका हल्लेखोराला पोलिसांनी अटक केली असून एक जण पळून गेल्याचे प्रतापगढ जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक काळू राम रावत यांनी सांगितले. जमावाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या जमावामध्ये पोलिस गणवेश घातलेली एक व्यक्तीही आढळून आली. यामुळे मारहाण करण्यामध्ये पोलिसही सामील असल्याची टीका करण्यात येत आहे. परंतु, रावत यांनी हा आरोप फेटाळून लावला. किंबहुना, चित्रीकरणात दिसत असलेला पोलिस अधिकारी हा प्रत्यक्षात या गो वाहतूकदारांना जमावापासून वाचविण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा रावत यांनी केला आहे.